**विकास योजना – सोयगाव नगर पंचायत, जि.छत्रपती संभाजीनगर.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये भागश: मंजूरीबाबत अधिसूचना...

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग,**

चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.

**शासन अधिसूचना क्र.टिपीएस-३०२१/५६४/प्र.क्र.९४/वि.यो.मंजूरी(भागश:)/२०२१/नवि-३०,**

**दिनांक** : ०१.११.२०२३

**शासन निर्णय** :- सोबतची शासकीय **अधिसूचना** महाराष्ट्र शासन राजपत्राच्या, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,**

URBAN DEVELOPMENT DEPTT. * MANTRALAYA, MUMBAI-32 * सत्यमेव जयते

(प्रसाद रा.शिंदे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) मा.उप सभापती, विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा.उपाध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) संचालक, नगर रचना तथा सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रति,

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
२) जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर .
३) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) सहसंचालक नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर.
५) सहायक संचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर शाखा, छत्रपती संभाजीनगर .
(प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या पाच प्रती विहीत मार्गाने शासनास सत्वर सादर कराव्यात.)

६) मुख्याधिकारी, सोयगाव नगर पंचायत, जि.छत्रपती संभाजीनगर .
७) व्यवस्थापक, शासकिय मुद्रणालय, छत्रपती संभाजीनगर.

(सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी भाग-एक मध्ये प्रसिध्द करुन तिच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, यांना सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर, सहायक संचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर शाखा, छत्रपती संभाजीनगर व मुख्याधिकारी, सोयगाव नगर पंचायत, जि.छत्रपती संभाजीनगर यांना पाठवाव्यात.)

८) निवडनस्ती (कार्यासन नवि-३०).

***********

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग,**
चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई - ४०० ०३२.
**दिनांक - ०१.११.२०२३**

# अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.*

**क्र.टिपीएस-३१२१/५५०/प्र.क्र.९५/वि.यो.मंजूरी(भागश:)/२०२१/नवि-३०:-** ज्याअर्थी शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र.एमसीओ-२०१४/प्र.क्र.१५९/नवि-१८, दि.०७.०३.२०१५ अन्वये, सोयगाव नगर पंचायतीची (जिल्हा छत्रपती संभाजीनगर ) स्थापना करण्यात आली आहे;

ज्याअर्थी, सोयगाव नगर पंचायत, जिल्हा छत्रपती संभाजीनगर (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधिलेले आहे) या नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना, अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिलेले आहे) चे कलम २३ अन्वयेच्या तरतुदीनुसार ठराव क्र.७२(०१), दि.०९.११.२०१७ अन्वये प्रारुप विकास योजना (यापुढे "उक्त प्रारुप विकास योजना" असे संबोधिलेले आहे) तयार करणेचा इरादा जाहीर केला असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणी, पृष्ठ क्र.४६ ते ४७ वर, दि.१४-२०.१२.२०१७ अन्वये प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये तिच्या हद्दीतील जमिनीचे सर्वेक्षण करुन, उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्यास ठराव क्र.०२, दि.०४.०६.२०२० अन्वये मान्यता दिली असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये दि.११-१७.०६.२०२० रोजी पृष्ठ क्र.३५ ते ३६ वर सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रसिध्द प्रारुप विकास योजनेवर विहित मुदतीत आलेल्या हरकती व सूचनांचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८(२) नुसार स्थापन केलेल्या नियोजन समितीने तिचा अहवाल उक्त नियोजन प्राधिकरणाकडे सादर केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने नियोजन समितीचा अहवाल विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये उक्त प्रारुप विकास योजनेत काही बदल करुन, ठराव क्र.०३, दि.०५.१०.२०२० अन्वये असे बदल प्रसिध्द करण्याचे ठरवून, या बदलांसह (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिलेले आहे) प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) अन्वये जनतेच्या अवलोकनार्थ

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

प्रसिध्द केली असून, त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, छत्रपती संभाजीनगर विभागीय पुरवणीमध्ये दि.२६.११.२०२० ते दि.०२.१२.२०२० रोजी पृष्ठ क्र.८३ ते ९५ वर प्रसिध्द झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील कलम ३० मधील उपकलम *(१)* मधील तरतूदीनुसार उक्त नियोजन प्राधिकरण यांनी उक्त विकास योजना उक्त फेरबदलांसह शासनास पत्र क्र.कावि/नपंसो/कलम ३०/१४२३/२०२०, दि.०२.११.२०२० अन्वये सादर केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २१ मधील तरतूदीनुसार, उक्त नगर पंचायतीची स्थापना झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीत अथवा उक्त कलमातील तरतुदीनुसारच्या वाढीव कालावधीत उक्त प्रारुप विकास योजना कलम ३० अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी उक्त अधिनियमाच्या कलम २१ नुसार, आदेश क्र.१५२, दि.२९.०१.२०२० अन्वये, उक्त प्रारुप विकास योजना, उक्त अधिनियमाचे कलम ३० अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर करण्यास दि.२१.०६.२०२१ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम-३१*(१)* मधील तरतूदीनुसार उक्त विकास योजनेबाबत आवश्यक त्या चौकशीनंतर तसेच संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला मसलत केल्यानंतर उक्त विकास योजना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ (एस.एम.-१ ते एस.एम.-२) मधील बदलांसह, सूचना क्र.टिपीएस-३०२१/५६४/प्र.क्र.९४/२०२१/ई.पी.प्रसिध्दी/नवि-३०, दि.०१.११.२०२३ सोबतच्या परिशिष्ट-ब मधील (ई.पी.-१ ते ई.पी.-१०) सारभूत बदल, वगळून भागश: मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१*(१)* मधील सुधारित तरतूदीनुसार, उक्त विकास योजना शासनास सादर केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या अथवा उक्त कलमातील तरतुदीनुसारच्या वाढीव कालावधीत उक्त प्रारुप विकास योजना शासनाने मंजूर करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, २०२० (सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९) द्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम १४८*(अ)* मधील सुधारित तरतूदीनुसार, अधिनियमातील प्रकरणे दोन, तीन, चार व पाच मधील तरतूदीप्रमाणे, कोणत्याही विकास योजना, प्रादेशिक योजना किंवा योजनांसाठीचा कालावधी विचारात घेतांना, देशांमध्ये किंवा राज्यामध्ये उद्भवणाऱ्या कोणत्याही महामारीच्या किंवा साथीच्या रोगाच्या फैलावास किंवा आपत्तीजन्य परिस्थितीस प्रतिबंध करण्याकरिता, भारत सरकारने किंवा, यथास्थिती, राज्य शासनाने केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक

तत्वांच्या किंवा टाळेबंदी उपाययोजनांच्या अंमजबजावणीमुळे, उक्त प्रकरणांनुसारची कोणतीही कार्यवाही पूर्ण होऊ शकत नसेल तर, असा कालावधी तसेच लोकसभा व विधानसभा आचारसंहितेचा कालावधी वगळणे आवश्यक आहे;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१*(१)* मधील तरतूदीनुसार तसेच इतर अनुषंगिक शक्तींचा वापर करुन शासन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

०१. **अ)** सोयगावनगरपंचायतीच्या प्रारुप विकास योजनेस सोबतच्या परिशिष्ट-अ मधील बदलांसह, सूचना क्र.टिपीएस-३०२१/५६४/प्र.क्र.९४/२०२१/ई.पी.प्रसिध्दी/नवि-३०, दि.०१.११.२०२३ सोबतच्या परिशिष्ट-ब मधील (ई.पी.-१ ते ई.पी.-१०) सारभूत बदल वगळून, मंजूरी देण्यात येत आहे.

**ब)** उक्त अधिनियमाच्या कलम ३१*(१)* नुसार उक्त विकास योजनेच्या मंजूरीसाठी दि.०१.११.२०२३ हा दिवस धरुन मुदतवाढ मंजूर करणेत येत आहे.

**क)** सोयगाव नगर पंचायतीची उक्त भागश: मंजूर विकास योजना सदर अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसानंतर अंमलात येईल.

<u>टिप:-</u>

१) जी आरक्षणे / नामाभिधान/ सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये व सूचना क्र.टिपीएस-३०२१/५६४ /प्र.क्र.९४/२०२१/ई.पी.प्रसिध्दी/नवि-३०, दि.०१.११.२०२३ सोबतच्या "परिशिष्ट-ब" मध्ये नमूद नाहीत, अशी आरक्षणे त्या-त्या प्रयोजनासाठी उक्त विकास योजनेत दर्शविण्यात आल्यानुसार मंजूर करणेत येत आहे.

२) विकास योजना नकाशावर अस्तित्वातील रस्ते दर्शविले असले अथवा नसले तरी ते प्रत्यक्ष जागेवर अस्तित्वात असल्याप्रमाणे कायम राहतील.

३) विकास योजना अहवालात नमूद केलेले आरक्षणाचे क्षेत्र अंदाजे असून, अंतिम विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षणाच्या हद्दीनुसार जागेवर प्रत्यक्ष मोजणीनुसार अंतिम राहील.

४) सार्वजनिक / निमसार्वजनिक विभागात दर्शविलेल्या खाजगी व भाडे तत्वावरील जागा, त्यातील सार्वजनिक / निमसार्वजनिक वापर सुरु असेपर्यंत सार्वजनिक / निमसार्वजनिक विभागात असल्याचे मानण्यात येईल. अन्यथा मुख्याधिकारी, सोयगाव नगर पंचायत, जि. छत्रपती संभाजीनगर अशा जागेवर लगतचा प्रमुख वापर विभागाबाबत खात्री करुन व सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचे पूर्व परवानगीने उक्त जागेवर विकास परवानगी अनुज्ञेय करु शकतील.

URBAN DEVELOPMENT DEPTT. ★ MANTRALAYA, MUMBAI-32 ★
सत्यमेव जयते

खाजगी मालकीच्या जागेवर विकास योजनेत दर्शविलेला अस्तित्वातील सार्वजनिक / निमसार्वजनिक वापर बंद झाल्यानंतर किंवा विकास योजनेत आरेखक चुकीमुळे सार्वजनिक / निमसार्वजनिक दर्शविला असल्यास, सदर जागेवर विभागीय सहसंचालक, नगर रचना, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या पूर्व परवानगीचे विकास योजनेतील लगतचा वापर अनुज्ञेय करु शकते.

५) सर्व्हे क्र. / गट क्र. / अंतिम भूखंड क्र. संबंधी आरेखनातील चुका, जागेच्या हद्दीबाबत, उच्च दाबाच्या विद्युतवाहिन्या दर्शविण्याबाबतच्या चुका, नदी, नाला इ. पाण्याचे स्त्रोत जागेवरील प्रत्यक्ष परिस्थितीनुसार अथवा नगर भूमापन अभिलेखानुसार, मंजूर रेखांकनानुसार पडताळणी करुन, संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पूर्व परवानगीने मुख्याधिकारी, सोयगाव नगर पंचायत, जि.छत्रपती संभाजीनगर दुरुस्त करु शकतील.

६) शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र.टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/कलम-३७(१कक)(ग) व कलम २०(४)/नवि-१३, दि.०२.१२.२०२० अन्वये मंजूर केलेली एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, त्यानंतर वेळोवेळीच्या बदलांसह सोयगाव नगर पंचायत क्षेत्राकरिता लागू राहील.

उपरोक्त भागश: मंजूर अंतिम विकास योजना – सोयगाव जनतेच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत मुख्याधिकारी, सोयगाव नगर पंचायत, जि.छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात, सदर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून एक महिन्यापर्यंत उपलब्ध करणेत येत आहे.

सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे www.maharashtra.gov.in (कायदे/नियम) या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशाने,***

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI

(प्रसाद रा.शिंदे)

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

# परिशिष्ट-अ

## विकास योजना - सोयगाव नगर पंचायत, जि.औरंगाबाद (मंजूर)

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासनाने मंजूर केलेले फेरबदल.

(शासन अधिसूचना क्र.टिपीएस-३०२१/५६४/प्र.क्र.९४/वि.यो.मंजूरी(भागशः)/२०२१/नवि-३०, दि.०१.११.२०२३ चे सहपत्र)

| अनु. क्र. | बदल | स्थान | आरक्षण क्र. | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रसिध्द विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० नुसार शासनास मंजूरीसाठी सादर विकास योजनेनुसारचा प्रस्ताव | शासनाने, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३१(१) नुसार मंजूर केलेला फेरबदल |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | SM-1 (M-1) | Village Soygaon Survey No.29(Pt.) | Site No.8 | "Site No.8-Cremation Ground" | "Site No.8-Cremation Ground" is proposed to be deleted and included in Residential Zone. | Refused to accord sanction and "Site No.8-Cremation Ground" is reinstated as per Plan published u/s 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. |
| 2 | SM-2 | Draft D.P. u/s 26 / 30 of the Act. | --- | The colour of Forest is shown in two difference colour. | The colour of Forest is shown in two difference colour. | In References (Legend) for "Forest" the colour code is shown in two difference colour. |

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशाने व नावाने,*

(प्रसाद रा.शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

## GOVERNMENT OF MAHARASHTRA

**Urban Development Department**
Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai - 400 032.
**Date** – 01.11.2023

# NOTIFICATION

***The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966***

**No.TPS-3021/564/CR-94/Partly Sanction/2021/UD-30**:- Whereas, Soygaon Nagar Panchayat has been established *vide* Government Notification, Urban Development Department No.MCO-2014/C.R.159/UD-18, dated the 07.03.2015;

And whereas, the Soygaon Nagar Panchayat, Dist.Chhatrapati Sambhajinagar (hereinafter referred to as "the said Planning Authority") *vide* its Resolution No.72(01), dated the 09.11.2017, has declared its intention under Section 23 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") to prepare Draft Development Plan for limits of the Soygaon Nagar Panchayat and notice of such declaration was published at Page No.46 to 47 in the *Official Gazette*, Chhatrapati Sambhajinagar Division Supplement dated the 14-20.12.2017;

And whereas, the said Planning Authority after carrying out surveys of the entire limit in its jurisdiction as required under Section 25 of the said Act, decided to publish a Draft Development Plan under section 26*(1)* of the said Act, *vide* its Resolution No.02, dated the 04.06.2020 and notice to that effect is published at Page No.35 to 36 in the *Official Gazette*, dated the 11-17.06.2020 for inviting suggestions and / or objections;

And whereas, after considering the suggestions and objections to the said Draft Development Plan received within stipulated period, the Planning Committee appointed under section 28*(2)* of the said Act, has submitted its report to the said Planning Authority;

And whereas, after considering the Report of Planning Committee, the Planning Authority vide its Resolution No.03, dated the 05.10.2020, had decided to make some modifications and to publish such modifications in the said Draft Development Plan (hereinafter referred to as "the said Modifications"), which were published in the *Official Gazette,* Chhatrapati Sambhajinagar Divisional Supplement dated the 26.11.2020 to 02.12.2020 on Page Nos.83 to 95 under Section 28*(4)* of the said Act;

And whereas, in accordance with the provision of sub-section (1) of Section 30 of the said Act, the said Planning Authority has submitted the said Draft Development Plan, along with the said Modifications to the Government for sanction vide its Marathi letter No.कावि/नपंसो/कलम ३०/१४२३/२०२०, dated the 02.11.2020;

And whereas, as per the provisions of section 21 of the said Act, the said Planning Authority is required to submit draft Development Plan u/s 30 of the said Act, to the Government within 3 years or within extended period as per provisions in this section from the date of its establishment;

And whereas, Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar vide Order No.152, dated the 29.01.2020 has extended the period under section 21 of the said Act, for submitting the Draft Development Plan under section 30 of the said Act to the Government upto 21.06.2021;

And whereas, in accordance with sub-section *(1)* of Section 31 of the said Act, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the State Government is of the opinion that the said Draft Development Plan should be sanctioned a partly with modifications as mentioned in **SCHDULE-A (SM-1to SM-2),** appended hereto excluding the substantial modifications (as **EP-1 to EP-10)** as specified in **SCHEDULE-B** appended to the Notice No.TPS-3021/564/CR-94/2021/EP-Publish/UD-30, dt 01.11.2023;

And whereas, in accordance with the amended provisions of section 31*(1)* of the said Act, the State Government is required to sanction draft Development Plan within six months or within extended period as per provisions in this section from the date of receipt of the draft Development Plan submitted by the said Planning Authority under section 31 of the said Act;

And whereas, in accordance with the amended provisions of section 148*(A)* of the said Act *vide* the Maharashtra Regional and Town Planning (Amendment) Act, 2020 (Maharashtra Act No. XIX of 2020), in computing the period, in relation to any Development Plan, Regional Plan or Scheme under the provisions of Chapter II, III, IV and V of the said Act, the period or periods during which any action could not be completed under the said chapters, due to enforcement of any Guidelines or lockdown measures by the Government of India or the State Government, as the case may be, to prevent the spread of any pandemic or epidemic or disaster situation arising in the Country or State and the period of Code of Conduct for Loksabha and Vidhansabha Elections shall be excluded;

Now therefore, in exercise of the powers conferred by section 31*(1)* of the said Act and of all other powers enabling it on that behalf, the Government of Maharashtra hereby:-

**01. A)** Accords Sanction the said Draft Development Plan for Soygaon Nagar Panchayat along with Modifications, as specified in **SCHEDULE - A** appended hereto, **excluding** the substantial Modifications (as **EP-1 to EP-10)** as specified in **SCHEDULE-B** appended to Notice No. TPS-3021/564/CR-94/2021/EP-Publish/UD-30, dt 01.11.2023.

**B)** Extends the period prescribed under Section 31*(1)* of the said Act, for sanctioning the said Draft Development Plan up to and inclusive of dt 01.11.2023.

**C)** The Said Sanctioned Development Plan (partly), called the Final Development Plan of Soygaon Nagar Panchayat shall come into force, after 30 days from the publication of this Notification in the *official Gazette*.

**Note:-**

1) The reservations / allocations /designations which do not appear in the **Schedule-A** appended hereto and **Schedule-B** appended to Notice No.TPS-3021/564/CR-94/2021/EP-Publish/UD-30, dt 01.11.2023, are hereby sanctioned for the respective purpose as designated in the Development Plan.

2) The existing roads whether shown or not on Development Plan shall remain existing as it exists on the actual site.

3) The areas of reserved sites as mentioned in Development Plan are approximate and tentative. The exact areas as measured on site as per the boundaries shown on the Development Plan shall be considered as the area of reserved site.

4) The private or rental premises designated in Public-Semi public Zone will continue to be in such zone as long as Public-Semi public user exists. Otherwise, the Chief Officer, Soygaon Nagar Panchayat, Dist. Chhatrapati Sambhajinagar in consultation with the Joint Director of Town Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar shall allow development permission on such land considering adjoining predominant land use zone, after due verification.

   After cessation of the existing public/semi-public use shown in the development plan on the privately owned land or if public/semi-public is shown in the development plan due to drafting error, the adjoining use in the development plan may be permitted on the said land with the prior permission of the Divisional Joint Director, Urban Planning, Chhatrapati Sambhajinagar Division, Chhatrapati Sambhajinagar.

5) The Chief Officer, Soygaon Nagar Panchayat, Dist. Chhatrapati Sambhajinagar with the prior permission of the Director of Town Planning, Maharashtra State Pune may correct the drafting errors in respect of typographical errors in Survey No./Gat No./Final Plot No., errors in boundaries of land parcels, errors in showing alignment of existing High Tension Line, water bodies like river, Nalas etc. by taking into account the details as per actual position, of water bodies or as per the City Survey Records.

URBAN DEVELOPMENT DEPTT. * MANTRALAYA, MUMBAI-32 * सत्यमेव जयते

6) The Unified Development Control and Promotion Regulation sanctioned *vide* Notification No.TPS-1818/CR-236/18/Section 37*(1AA)(c)* and Section 20(4)/UD-13, dated the 02.12.2020, as amended from time to time, shall be applicable to the area of Soygaon Nagar Panchayat.

The aforesaid final Development Plan of Soygaon Nagar Panchayat partly sanctioned by the State Government *vide* this Notification shall be kept open for inspection by the general public during office hours on all working days for a period on **one month** from the date of coming into force of this Development Plan, in the office of the Chief Officer, Soygaon Nagar Panchayat, Dist. Chhatrapati Sambhajinagar.

This Notification is available on the Government of Maharashtra website www.maharashtra.gov.in (Acts/Rules)

***By order and in the name of the Governor of Maharashtra,***

(Prasad R.Shinde)
**Under Secretary to Government**

# SCHEDULE-A

**Development Plan – Soygaon Nagar Panchayat, Dist.Aurangabad (Sanctioned)**

**Modifications Sanctioned by the Government u/s.31*(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966**

**(Accompaniment to the Government Notification No.TPS-3021/564/CR-94/D.P. Sanction(Partly)/2021/UD-30, Dt. 01.11.2023)**

| Sr. No. | Modific-ation | Location | Site No. | Proposal as per Development Plan published u/s 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as per Development Plan submitted to State Government for sanction u/s 30 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. | Proposal as sanctioned by the Government u/s 31 *(1)* of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | SM-1 (M-1) | Village Soygaon Survey No.29(Pt.) | Site No.8 | "Site No.8-Cremation Ground" | "Site No.8-Cremation Ground" is proposed to be deleted and included in Residential Zone. | Refused to accord sanction and "Site No.8-Cremation Ground" is reinstated as per Plan published u/s 26 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. |
| 2 | SM-2 | Draft D.P. u/s 26 / 30 of the Act. | --- | The colour of Forest is shown in two difference colour. | The colour of Forest is shown in two difference colour. | In References (Legend) for "Forest" the colour code is shown in two difference colour. |

***By Order and in the name of the Governor of Maharashtra,***

URBAN DEVELOPMENT DEPTT. * MANTRALAYA, MUMBAI-32 * सत्यमेव जयते

(Prasad R.Shinde)
**Under Secretary to Government**